# प्रेसनोट

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे
दि. २९/०६/२०१८

## सासवड पोलीस ठाणे, पुणे ग्रामिण येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक व खाजगी इसमास एक लाख रूपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडले.

---

यातील तक्रारदार यांच्या विरूद्ध सासवड पोलीस स्टेशन येथे भा.द.वि.कलम ३२५ प्रमाणे गुन्हा दाखल असुन सासवड येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सासवड न्यायालयात जामीन मंजुर होणे कामी मद्त करणेसाठी सासवड पोलीस ठाणे, (पुणे ग्रामिण) येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक, मुकुंद काशीनाथ पालवे याने तक्रारदार यांचेकडे १,५०,०००/- रूपये लाचेची मागणी केली होती. सदर बाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयामध्ये तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीची दिनांक २८/०६/२०१८ रोजी पडताळणी केली असता लोकसेवक मुकुंद पालवे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, सासवड पोलीस ठाणे, पुणे ग्रामिण, पुणे याने तक्रारदार यांच्या विरूद्ध दाखल गुन्हयात सासवड येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सासवड न्यायालयात जामीन मंजुर होणे कामी मद्त करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे १,५०,०००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती १,००,०००/- रूपये लाचेची मागणी करून रक्कम स्विकारली

त्यावरुन दिनांक २८/०६/२०१८ रोजी सापळा कारवाई केली असता सापळा कारवाईमध्ये लोकसेवक मुकुंद काशीनाथ पालवे, वय-४२, सहाय्यक पोलीस निरीक्षक, सासवड पोलीस ठाणे, पुणे ग्रामिण, पुणे याच्या सांगण्यावरून खाजगी इसम श्रीकांत बाळासाो ताम्हाण, वय २९, रा.इखतपुर, ता.पुरंदर, जि. पुणे याचेकरवी मौजे इखतपुर, ता.पुरंदर या गावी येथे तक्रारदार यांचेकडून १,००,०००/- रूपयांची लाचेची रक्कम स्विकारल्यावर त्यांना रंगेहात पकडण्यात आले असुन त्यांचेवर सासवड पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण, पुणे ग्रामीण येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई हि मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. संदीप दिवाण यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याबाबतचे आवाहन श्री. संदीप दिवाण, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे-
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**
८. **Mobile App - www.acbmaharashtra.net**

( सुहास नाडगौडा )
सहा.पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.